ईश्वरप्राप्तीसाठी साधना : खंड ३

# अध्यात्माचे प्रास्ताविक विवेचन

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४३, इंग्रजी २०१, कन्नड १९६, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**नोव्हेंबर २०२३ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ६७ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २१.११.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**प्रकरण १. संस्था, संस्थापक आणि संस्थेची अध्यात्मप्रसार करण्यामागील भूमिका** ९

१ इ. वक्ता : आम्ही अध्यात्मप्रसाराकडे वळण्याची कारणे ११

**प्रकरण २. अध्यात्म : महत्त्व, श्रेष्ठत्व आणि अपसमज** १४

२ अ. विषय कोणता आणि त्याचे महत्त्व काय ? १४

२ अ १. प्राणीमात्रांचे ध्येय - चिरंतन आणि सर्वोच्च आनंदाची प्राप्ती १४

२ अ २. मनुष्याचा जन्म पुनःपुन्हा होण्याची कारणे १४

२ अ ३. मनुष्याचे जीवन आणि सुख-दुःख १४

२ अ ७. विज्ञान आणि अध्यात्मशास्त्र १७

२ अ ८. नास्तिकता २०

२ अ ९. निरर्थक बुद्धीप्रामाण्यवाद २१

२ अ ११. चार्वाक तत्त्वज्ञान २४

**प्रकरण ३. सत्संगाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये** २५

३ अ. विषय कसा मांडला जाणार आहे ? २५

३ आ २. किती काळ सत्संगाला यावे ? ३२

**प्रकरण ४. साधना : अर्थ, महत्त्व आणि प्रकार** ३८

**प्रकरण ५. साधनेसाठी आवश्यक गुण कोणते ?** ४२

५ इ. बुद्धीचा अडथळा दूर करणे ४९

**प्रकरण ६. साधनेचा मूलभूत सिद्धांत आणि काही प्रमुख तत्त्वे** ५१

**प्रकरण ७. साधना करतांना कोणत्या चुका टाळाव्यात ?** ६५

७ अ. गुरु शोधणे ७ आ. सांप्रदायिक साधनेत अडकणे ६५

**प्रकरण ८. अष्टांग साधना** ६६

८ अ. अष्टांग साधनेच्या टप्प्यांचा निकष साधकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असणे ६६

८ आ. अष्टांग साधनेतील सूत्रे ६७

**प्रकरण ९. साधनेशी संबंधित काही कृतींसंदर्भातील दृष्टीकोन** ९६

**प्रकरण १०. साधनेविषयी अन्य मार्गदर्शन** ९८

**प्रकरण ११. साधनेची फलश्रुती : आध्यात्मिक उन्नती** १०३

**प्रकरण १२. समारोप** १०४

**प्रकरण १३. उपसंहार (सारांश)** १०५

卐 **परिशिष्ट** १०७

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** १०९

---

टीप - 'अध्यात्म' या विषयावर कोणाला प्रास्ताविक विवेचन करायचे असल्यास त्याला त्या प्रवचनात 'कोणती सूत्रे सांगावीत ?', हे कळण्यासाठी ग्रंथातील त्या त्या लिखाणाच्या शेजारी उभी रेष आखली आहे.

**हा ग्रंथ 'इ-बुक' स्वरूपात उपलब्ध ! : Sanatanshop.com/ebooks**

## मनोगत

सनातन संस्थेच्या वतीने स्वतःची साधना म्हणून बरेच साधक ठिकठिकाणी प्रवचने आणि सत्संग घेतात. प्रवचनात, तसेच पहिल्या सत्संगात अध्यात्मासारख्या अथांग विषयातील नक्की काय सांगायचे, हे ठरवणे त्यांना अवघड जाते. त्यांच्या सोयीसाठी, तसेच अशी प्रवचने आणि सत्संग यांना जे उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांच्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे.

धर्मशास्त्रात सांगितलेल्या सहस्रो साधनांपैकी नेमक्या कोणत्या साधनेला आज प्रारंभ करावा, हे बहुतेकांना ठाऊक नसते. प्रत्यक्ष साधना न करणाऱ्यांना अध्यात्म या विषयाची नुसती माहिती ऐकून काहीएक लाभ होत नाही, अयोग्य साधना करणाऱ्यांनाही होत नाही; उलट अशा साधनेने अनुभूती येत नाहीत आणि त्यामुळे त्यांचा अध्यात्मावरचा विश्वासच अल्प होत जातो. देवळातील कीर्तन-प्रवचन यांना जाणाऱ्या बऱ्याच जणांना वाटते की, आपण साधना करतो. धार्मिक पुस्तकांचे वाचन आणि अभ्यास करणाऱ्यांनाही वाटते की, आपल्याला अध्यात्मातले थोडे-फार कळते. खरे म्हणजे वरील दोन्ही उदाहरणांमध्ये बहुधा तसे नसते. कीर्तन आणि प्रवचन यांना जाणारे किंवा पुस्तकांचे वाचन करणारे बहुधा केवळ वेळ जावा म्हणून किंवा छंद म्हणून तसे करतात. त्यांच्याकडून खरीखुरी साधना होत नसते. साधना म्हणजे नेमके काय आणि योग्य साधना कशी करावी, हे सर्वांना कळावे, यांसाठी सनातन संस्थेच्या वतीने प्रवचने अन् सत्संग घेतले जातात.

प्रवचन एक ते दीड घंट्याचे (तासाचे) असते. या ग्रंथात दिलेले सर्वच लिखाण सत्संगाच्या दृष्टीने लिहिलेले आहे. त्यातील कोणता भाग प्रवचनात घ्यायचा, हे कळावे, यासाठी त्या लिखाणाच्या शेजारी त्या त्या ठिकाणी उभी रेष आखली आहे. एक ते दीड घंट्याच्या साप्ताहिक सत्संगात या ग्रंथातील काही भाग प्रत्येक आठवड्याला थोडा थोडा असा शिकवता येतो. अशा प्रकारे हा ग्रंथ शिकवून पूर्ण झाला की, सनातनच्या

विविध ग्रंथांतील विषय पुढच्या पुढच्या सत्संगांत आणि प्रवचनांत क्रमाक्रमाने शिकवले जातात.

नाशिक येथील प.पू. बेजन न. देसाई यांनी ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर वाचून केलेल्या सूचना आणि आशीर्वाद यांसाठी आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

या ग्रंथात सांगितलेली साधना समजून घेऊन प्रत्यक्ष साधनेला काही जणांनी तरी प्रारंभ करावा, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

(‘अध्यात्मशास्त्र’ या ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत ‘धर्माचे मूलभूत विवेचन’ या ग्रंथात दिले आहे.)

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.